# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. २९/०८/२०१७

## *जिल्हा वर्धापन दिनानिमित्त जिल्हा पोलीस दलातर्फे भव्य पारंपारिक समुह नृत्य स्पर्धेचे आयोजन*

- *मोठया प्रमाणात युवक-युवतींचा सहभाग*

गडचिरोली जिल्हा हा आदिवासी बहुल जिल्हा असून आदिवासींची स्वतंत्र अशी संस्कृती येथे नांदत आहे. त्या संस्कृतीला उभारी देण्यासाठी व आदिवासींच्या अंगीकृत असलेल्या विविध कलागुणांना वाव व संधी प्राप्त करुन देण्यासाठी गडचिरोली पोलीस विभागामार्फत संपूर्ण गडचिरोली जिल्हयामध्ये २६ ऑगस्ट जिल्हा वर्धापन दिनानिमित्त २६ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर दरम्यान विविध पारंपारिक समुह नृत्य (रेला) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हयात दिनांक २६ ऑगस्ट पासून आजपावेतो पोस्टे कुरखेडा, पुराडा, उपपोस्टे देचलीपेठा, पेंढरी, पोमके हेडरी, आलदंडी, गट्टा (जां.), पोटेगांव, घोट, ताडगांव, कोठी, नारगुंडा, कारवाफा, गोडलवाही, मालेवाडा याठिकाणी आतापर्यंत स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रत्येक पोस्टे, उपपोस्टे, पोमके येथे जवळपास ९ ते २० संघ सहभागी झाले होते. उपस्थित संघापैकी प्रत्येक पोस्टावर प्रथम, व्दितीय, तृतीय याप्रमाणे क्रमांक घोषीत करून विजेत्यांना ३,०००/-, २,०००/-, १,०००/- रू. असे अनुक्रमे रोख पारितोषीक देण्यात आले. तसेच प्रत्येक ठिकाणी जवळपास ८०० ते २००० नागरिकांनी कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली होती. त्याचबरोबर स्पर्धे दरम्यान कार्यक्रमाला उपस्थित सर्व संघ व नागरिकांना भोजनाची व्यवस्थाही करण्यात आली होती.

आदिवासी नृत्याला चांगले व्यासपीठ मिळावे व आदिवासींचा पारंपारिक नृत्य प्रकार समृध्द व्हावा याकरीता गडचिरोली पोलीस दलातर्फे दरवर्षी हा उपक्रम राबविला जाणार आहे. दरवर्षी जिल्हा वर्धापन दिनाच्या निमित्ताने ही स्पर्धा घेतली जाणार आहे.






